महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २०२ वा | दिनांक : ०१/०६/२०२५ | वार : रविवार

# सावकारी जाचाला कंटाळून व्यापाऱ्याची आत्महत्या

**बीड :** सावकाराच्या छळाला कंटाळून एका व्यापाऱ्याने गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवल्याची गंभीर घटना सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे चर्चेत आलेल्या बीडमध्ये घडली आहे. मृत्यूपूर्वी या व्यापाऱ्याने पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांना पत्र लिहून आपली कैफियत मांडली होती हे विशेष.

यासंबंधीच्या माहितीनुसार, संजय कांकरिया असे मृत व्यापाऱ्याचे नाव आहे. त्यांनी अमृत भोसले व दीपक साळुंके यांच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. कांकरिया यांनी या दोघांचे ६ पट पैसे परत केले. पण त्यानंतरही त्यांनी पैशाचा तगादा लावला. त्यांनी त्यांना चटके दिले. जिवे मारण्याची धमकी दिली. या सातत्याने होणाऱ्या छळाला कंटाळून अखेर संजय कांकरिया यांनी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. या प्रकरणी पाटोदा पोलिस ठाण्यात खासगी सावकार अमृत भोसले, दीपक साळुंके यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या हे दोघेही फरार आहेत. त्यांना पकडण्यासाठी पोलिसांचे एक पथक रवाना करण्यात आले आहे.

संजय कांकरिया हे व्यापारी होते. त्यांनी ३ दिवसांपूर्वीच जगाचा निरोप घेतला आहे. त्यांनी व्यवसायात नुकसान झाल्यामुळे भोसले व साळुंके यांच्याकडून कर्ज घेतले होते. या दोन्ही सावकारांची नजर त्यांच्या शेतजमिनीवर होती. त्यामुळे त्यांनी कांकरिया यांनी ६ पट पैसे फेडल्यानंतरही पैशांचा तगादा कमी केला नाही. त्यांनी पैसे दिले नाही तर चटके देऊन तुझ्यासह तुझ्या कुटुंबाला जिवत मारून टाकू अशी धमकी दिली. ही धमकी संजय कांकरिया यांना सहन झाली नाही. त्यामुळे त्यांनी बीडचेच पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांना पत्र लिहून शेतातील पत्र्याच्या शेडला गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ माजली आहे.

बीड जिल्ह्यात अवैध सावकारी ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. बँकिंग सुविधांचे अपुरे जाळे, आर्थिक अडचणी आणि पैशांची निकड यामुळे अनेक नागरिक खासगी सावकारांच्या जाळ्यात अडकतात. त्यातून त्यांना व्याजाचे अवास्तव दर, कर्जाची सक्तीने वसुली आणि शारीरिक-मानसिक छळ यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. या प्रथमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत. कायद्याचा अभाव आणि प्रशासकीय निष्क्रियता यामुळे ही समस्या आणखी गंभीर बनली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे बीड जिल्हा सध्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे चर्चेत आला आहे. या हत्या प्रकरणात माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा सहकारी वाल्मीक कराडला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात मुंडे यांना आपले मंत्रिपद गमवावे लागले. सध्या ते इगतपुरीच्या विपश्यना केंद्रात ध्यानधारणा करत असल्याची माहिती आहे.

# रूपाली चाकणकर खोटे बोलू नका - सुषमा अंधारे



**मुंबई :** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी भाजप आमदार परिणय फुके यांच्याविरोधात आयोगाकडे कोणतीही तक्रार आली नसल्याचा दावा केला होता. पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या प्रकरणी ७ पानी पुरावा दाखवत त्यांच्यावर खोटारडेपणाचा आरोप केला आहे. रूपाली चाकणकर यांना काम करायचे नाही हे स्पष्ट आहे. पण त्यांनी त्यासाठी खोटे नये, असे त्यांनी म्हटले आहे.

आमदार परिणय फुके यांचे दिवंगत बंधू संकेत फुके यांच्या पत्नी प्रिया फुके यांनी आपल्या कुटुंबीयांवर कौटुंबिक छळाचा आरोप केला आहे. या प्रकरणी आपल्याला जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचाही त्यांचा दावा आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी यावर भाष्य करताना परिणय फुके यांच्याविरोधात आयोगाकडे एकही तक्रार आली नसल्याचा दावा केला. या पार्श्वभूमीवर सुषमा अंधारे यांनी त्यांच्यावर खोटारडेपणाचा आरोप केला आहे.

सुषमा अंधारे शनिवारी एका पोस्टमध्ये म्हणाल्या की, परिणय फुके यांच्या भावजयीने महिला आयोगाकडे कुठलाही अर्ज केला नव्हता असे श्रीमती चाकणकर यांनी सांगितले. मात्र २४ जून २०२४ रोजी प्रिय फुके यांनी रीतसर ७ पाणी अर्ज केला होता. हे सहा दिवस आधी मी पत्रकार परिषदेतही सांगितले आहे आणि आत्ता त्याची इथे प्रत शेअर करत आहे.

तुम्हाला काम करायचे नाही हे स्पष्ट आहे. मात्र त्यासाठी खोट बोलू नका. पीडित तुमच्यापर्यंत पोहोचण्याचा सर्व मार्गांनी प्रयत्न करतात. सदरची पिडित ही दोन लहान मुलांची आई आहे. तिने आपल्याला टोल फ्री नंबरवर फोन करावा, तर टोल फ्री नंबर आपले लागत नाहीत. नागपूरहून इथे येणे लहान मुलांना सोडून शक्य होत नाही. हा पत्रव्यवहार आपल्याला त्यांनी ई-मेल आणि पोस्टल या दोन्ही पद्धतीने केलेला आहे, असे त्या चाकणकरांना उद्देशून म्हणाल्या.

सुषमा अंधारे यांनी शेअर केलेल्या पत्रात प्रिया फुके यांनी गैरअर्जदार/आरोपी म्हणून परिणय फुके यांचा उल्लेख केला आहे. माझे पती संकेत फुके यांच्या मृत्यूनंतर मला व माझ्या मुलांना सासरच्या मंडळींनी मोठ्या प्रमाणात मानसिक त्रास दिला. वारंवार रूममध्ये येऊन आमच्या सामानाची चेकिंग करणे, चोरीचे खोटे आरोप करून घराबाहेर काढण्याचा प्रयत्न करणे, महत्वाची कागदपत्रे जबरदस्तीने घेणे, शिळे अन्न खायला देणे, मुले जेवताना त्यांचे ताट फेकून देणे असे प्रकार आमच्यासोबत होत होते. माझ्या पतीच्या नावे असलेले दुकान, प्लॅट हे नितीन फुके, परिणय यांच्याकडे आहे. त्यांच्याकडे त्याची मागणी केली असता तुला जे करायचे ते करून घे, असे धमकावतात, , असे प्रिया फुके यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे, प्रिया फुके यांच्या सासू तथा परिणय फुके यांच्या मातोश्री रमा फुके यांनी सुषमा अंधारे व रोहिणी खडसे यांना आपलेही म्हणणे ऐकूण घेण्याचे आवाहन केले होते. तुही प्रिया फुके यांचे म्हणणे ऐकूण घेतले. तिच्यावर विश्वास ठेवून माध्यमांना माहिती दिली. मी सुद्धा एक महिला व आई आहे. माझ्या कुटुंबावर आरोप करण्यापूर्वी माझीही बाजू समजून घेतली असती, चर्चा केली असती तर तुम्हाला खरी वस्तुस्थिती कळली असती आणि डोळेसुद्धा उघडले असते, असे त्यांनी म्हटले होते.

# मी स्वतःहून भाजप सोडली नाही - प्रताप पाटील चिखलीकर यांचा दावा



**नांदेड :** मी स्वतःहून पक्ष सोडलेला नाही. भाजपच्या अंतर्गत राजकीय तडजोडीअंतर्गत मला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पाठवण्यात आले, असा थेट गौप्यस्फोट करत आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

नांदेडमध्ये बोलताना आमदार चिखलीकरांनी म्हटले आहे की, मी ज्या पक्षात काम करतो, त्या पक्षाची वाढ आणि बळकटीकरण हीच माझी प्राथमिक जबाबदारी आहे. आणि त्यासाठी मी सातत्याने काम करत आहे.

प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले की, मी लहान माणूस आहे, पण माझ्यावर टीका करण्यासाठी नांदेड जिल्ह्यात अनेकांना तयार करून ठेवलेले आहे. त्यांनी आपल्या कामगिरीची आठवण करून देताना सांगितले. मी चार माजी आमदार आणि खासदारांचा पक्षप्रवेश घडवून आणला. अजित पवार यांना तीन वेळा जिल्ह्यात आणले पण रिकाम्या हाताने पाठवले नाही. पक्ष बदलण्याचा निर्णय माझा नव्हता महायुतीमध्ये तडजोडीसाठी मला राष्ट्रवादीमध्ये पाठवण्यात आले.

याच दरम्यान, चिखलीकर यांनी आपल्या फेरपक्षप्रवेशावरून अप्रत्यक्षपणे अशोक चव्हाणांवर निशाणा साधला. मी फेरप्रवेश दादांच्या (शरद पवार) उपस्थितीत केला नाही, असे म्हणत आमदार चिखलीकरांनी सूचक टोला लगावला आहे. तर २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विधानाची आठवण करुण देताना ते म्हणाले की, फडणवीस साहेबांनी स्पष्ट सांगितले होते की, अशोकराव लीडर नाहीत, डीलर आहेत. या विधानाचा संदर्भ देत त्यांनी पुन्हा एकदा अशोक चव्हाणांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अमित शहा यांच्या उपस्थितीत माजी मंत्री डी. पी. सावंत यांनी भाजपमध्ये पुन:प्रवेश केला. या प्रवेशावरूनही चिखलीकरांनी अप्रत्यक्षपणे टोला लगावत सांगितले की, काहींच्या फेरप्रवेशात थाटमाट असतो, पण माझ्या बाबतीत तसे नव्हते. मी काम करून दाखवतो, नुसता गाजावाजा करत नाही.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ जून २०२५

# वर्दीतील सहृदयी माणूस



सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रीद घेऊन महाराष्ट्र पोलीस प्रशासन सातत्याने काम करीत असते. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला की पोलीस प्रशासनाची आपणास आठवण येते. त्यांच्यामुळे समाजात शांतता आणि सुरक्षितेची भावना निर्माण होते याची जाणिव आम जनतेला आहे.

**आयुष्याची जडणघडण :**
मा. बंडू यादवराव पगारे हे आज आपल्या ३५ वर्ष २ महिन्याच्या प्रदीर्घ पोलीस सेवेतून सन्मानाने सेवा गौरवित होत आहेत. व्यक्तीची जडणघडण कोणत्या विचार व संस्कारात झाली यावरून त्याच्या संबंध आयुष्याची उभारणी होत असत . बुद्धप्रिय आर. के . त्रिभुवन (' दे दान फिटे गिराण 'या आत्मकथनाचे लेखक) याचे ते भाचे आहेत. या आत्मकथनाची संपूर्ण महाराष्ट्रांनी घेतील आहे.त्यामुळे महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचे संस्कार लहानपणापासून त्यांच्या मामा कडून मिळालेले आहेत . शिक्षण हेच आपल्या जीवनातील प्रगतीचा एकमेव मार्ग हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा मूलमंत्र मनाशी बाळगून स्वतः व व कुटुंबाला शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून उच्च शिक्षण देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांनी केला.

**एकत्रित कुटुंब पद्धतीवर निष्ठा :**
पगारे साहेबाचा एकत्रित कुटुंब पद्धतीवर निष्ठा व विश्वास आहे . ती आज ही जोपासतात. आज त्यांच्या कुटुंबात चार भाऊ, तीन बहिणी आणि प्रत्येकाचा एक मुलगा आणि एक मुलगी असा मोठा परीवार आहे. त्यांच्या सौभाग्यवती पद्ममा वहिनीची खंबीर साथ त्यांना आयुष्याभर मिळाली व संकेत(मुलगा) प्रतिमा (मुलगी) उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या आयुष्याला घडवण्याचा प्रयत्न करीत याचा मनस्वी आनंद आहेच.

**सामाजिक जाणीव :**
व्यक्ती किती मोठ्या पदावर असली तरी ती समाजापेक्षा मोठी नाही हे कायम त्यांच्या कृतीतून दाखवून देत. विशेषतः त्यांच्या आई वडील आणि मामा यांच्या पुण्यतिथी निमित्त , दे दान फिटे गिराणं , फकिरा कादंबरी , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र होतकरू विद्यार्थी यांना ते ग्रंथांचे मोफत वाटप करून वैचारिक सामाजिक बांधिलकी ते जोपासन्याचा ते जाणीव प्रयत्न ते करतात. समाजात वाचन चळवळ रुजविण्याचा प्रयत्न केला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटलं प्रमाणे अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारा अधिक गुन्हेगार असतो. म्हणून पोलीस प्रशासनात या बाबी तर नित्याच्याच त्याच्याच असतात . परंतु अन्याय करणारी व्यक्ती कोणत्याही घटकाची व कितीही श्रीमंत असले तरी व अन्याय झालेली व्यक्ती कोणत्याही घटकाची व कितीही गरीब असली तरी पगारे साहेबांनी कायम अन्याय झालेल्या व्यक्तीला न्याय मिळवून देण्यासाठी जे काही सहकार्य करता येतील ते सामाजिक बांधिलकीचे तत्व त्यांनी सेवेत जोपासले.

**नि:स्वार्थ व निष्कलंक सेवा**
मा. बंडू यादवराव पगारे यांच्या १९९० मध्ये राज्य राखीव पोलीस दल दौंड येथून झाली .१९९७ मध्ये त्यांनी जालना येथील राज्य राखीव दलात बदली झाली. २००२ जिल्हा पोलीस, छत्रपती संभाजीनगर येते रुजू झाले.२००७ मध्ये महाराष्ट्रभर गाजलेल्या खैरलांजी प्रकरणाच्या चौकशीच्या अनुषंगाने त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका पोलीस प्रशासनात राहिली आहे.२००८ मध्ये सिटी चौक पोलीस स्टेशन. २०१४ मध्ये गुन्हे शाखेत कार्यरत होते. २०१७ मध्ये त्यांच्या विशेष उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन पोलीस महासंचालक साहेबांनी त्यांना सन्मानित केले आहे.२०१८ ते आज पर्यंत नागरी हक्क संरक्षण विभागातून सेवानिवृत्त होत आहेत. आज पर्यंतच्या पोलिस सेवेत त्यांना ४२५ बक्षीसे मिळालेली आहेत. ही बाब त्यांच्यासाठी गौरवाची व समाजासाठी भूषणावह आहेच. विशेषत: 'पोलीसवाले के कुर्तेको चार-चार जेब होते है ' हा हिंदी चित्रपटातील संवाद प्रसिद्ध आहे परंतु पगारे साहेब हे कोणत्याही आमिषाला बळी न पडतात आपल्या प्रती व कर्तव्याच्या प्रती एकनिष्ठ, प्रमाणिकपणे पोलीस प्रशासनाला सेवा दिली म्हणून आज सेवा गौरव होत.त्यानिमित्ताने मी, माझे कुटुंबीय व समाजाच्या वतीने हार्दिक हार्दिक शुभेच्छा व भावी आयुष्य आरोग्यसंपन्न राहो ही मनःपूर्वक सदिच्छा....! 💐 🙏

**डॉ. संजय भालेराव**
लोकप्रशासन विभागप्रमुख शिवाजी महाविद्यालय, कन्नड
मो. 99706 88607

## संतोष दराडेंच्या संघर्षाला यश; तहसीलदार व ग्राम अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर दुसऱ्या दिवशी उपोषण मागे!



**सिंदखेडराजा (गजानन मुंढे)** खडकपूर्णा नदीपात्रातील आमरण उपोषणाची यशस्वी सांगता; प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर दराडेंनी उपोषण मागे घेतलेसिंदखेडराजा तालुक्यातील अवैध रेती उत्खननाविरोधात हिवरखेड पूर्णा येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष अंबादास दराडे यांनी सुरू केलेल्या बेमुदत आमरण उपोषणाची आज दिनांक ३० में रोजी यशस्वी सांगता झाली. प्रशासनाच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपामुळे हा निर्णय घेण्यात आला.आज दिनांक ३० मे रोजी सकाळी किनगाव राजा पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्री. विनोद नरवाडे यांनी उपोषणस्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर दुपारी सिंदखेडराजा येथील तहसीलदार अजित दिवटे यांनी देखील खडकपूर्णा नदीपात्रात थेट उपोषणस्थळी भेट देत दराडे यांच्याशी संवाद साधला.सायंकाळच्या सत्रात तहसीलदार अजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाचे ग्राम अधिकारी गौरख पवार आणि जाधव यांनी उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. प्रशासनाकडून सकारात्मक आश्वासने मिळाल्याने आणि योग्य कारवाईचे आश्वासन दिल्याने, संतोष दराडे यांनी आपले बेमुदत आमरण उपोषण शांततेच्या मार्गाने समाप्त करण्याचा निर्णय घेतला.दराडेंनी मागील दिवशी पुढील प्रमुख मागण्या मांडल्या होत्या:तालुक्यातील विविध गावांमधील अवैध रेती उत्खननाचे अधिकृत मोजमाप व अहवाल प्रसिद्ध करणेहिवरखेड रेती घाटाच्या परवानग्यांचे तपशील व CCTV फुटेज उपलब्ध करून देणेतहसीलदार अजित दिवटे यांच्या संमतीने सुरू असलेल्या कंत्राटाची चौकशी व कारवाईरेती साठ्याचा अधिकृत अहवाल सादर करणेया मागण्यांबाबत प्रशासनाने तातडीने तपासणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे लेखी/तोंडी आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले.या उपोषणामुळे सिंदखेडराजा तालुक्यातील अवैध रेती उत्खननाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. दराडे यांचे आंदोलन लोकशाही मार्गाने प्रशासनाला जागे करण्याचे यशस्वी उदाहरण ठरले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ जून २०२५


## कृषिमंत्रीपद म्हणजे ओसाड गावाची पाटीलकी : माणिकराव कोकाटे यांचे पुन्हा तिरकस विधान



**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतमालाच्या प्रचंड नुकसानीनंतर शेतकरी मदतीच्या अपेक्षेने सरकारकडे पाहतोय. मात्र, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे मदतीच्या आश्वासनांपेक्षा वादग्रस्त विधानांनीच चर्चेत राहतात. नुकत्याच सिन्नर दौऱ्यात त्यांनी नुकसानग्रस्त शेती पाहताना "ढेकळांचे पंचनामे करायचे का?" असे वक्तव्य करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले होते. या विधानावरून राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. "या मंत्र्याचं डोकं ठिकाणावर आहे का? असा थेट सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी करत सरकारलाच इशारा दिला आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, जर कोकाटेंना लगाम घातला नाही, तर काँग्रेस आणि शेतकरीच त्यांना योग्य तो धडा शिकवतील, असा इशाराही त्यांनी दिला. एकडे सपकाळांनी हा इशारा देण्यापूर्वीच माणिकराव कोकाटे यांनी पुन्हा एक वादग्रस्त वक्तव्य केले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये बोलताना ते म्हणाले की, कृषी मंत्रालय म्हणजे ओसाड गावाची पाटीलकी आहे, ती अजितदादांनी मला दिली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, हा तोच मंत्री आहे ज्याने शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यांशी केली, कर्जमाफीतून साखरपुडे करतात म्हणाला. आता ढेकळांचे पंचनामे म्हणतोय! याला ना शेतकरी कळतो ना शेतकी, मग कृषी मंत्रालय त्याच्या हातात का?. केंद्र सरकारने हमीभावात फार मोठी वाढ केली असल्याचा देखावा केला आहे. पण २००४ ते २०१४ या १० वर्षांत मनमोहनसिंह सरकारने हमीभावात १२० ते १५० टक्के वाढ दिली होती. मोदी सरकारने मात्र १० वर्षांत केवळ ४५ टक्के वाढ केली आहे. हे शेतकऱ्यांच्या हातात भोपळा देण्यासारखं आहे," अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, नाशिकसह उत्तर महाराष्ट्रात झालेल्या अवकाळी पावसामुळे कांदा, द्राक्ष, गहू, हरभरा, सोयाबीन यांसारख्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी संकटात असताना सरकारकडून सहवेदना आणि तत्काळ मदतीची अपेक्षा आहे. मात्र, कोकाटेंसारख्या मंत्र्यांनी केलेली उपहासात्मक वक्तव्ये ही शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारी असून, ती सरकारच्या संवेदनशीलतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

## मी बारामतीत येतोय दम असेल तर अडवा : लक्ष्मण हाकेंचा सुरज चव्हाणवर हल्लाबोल



**पंढरपूर :** सुरज चव्हाणला सांगा मी रात्र-दिवस वाड्या-वस्त्यावरती फिरतो आहे. गावगाड्यात फिरतोय. रोज जवळजवळ दोन ते तीन जिल्ह्याची सीमा ओलांडत आहे. सरुज चव्हाण यांच्या अंगात खूप खुमखुमी असेल तर आज मी बारामतीमध्ये आहे, पंधऱ्याला येत आहे, बारामती शहरात येत आहे. तुझ्यात आणि तुझ्या अजितदादांच्या कार्यकर्त्यांना माझे चॅलेज आहे मी आज बारामतीमध्ये येत आहे, तुमच्यात दम असेल तर बारामतीमध्ये या, असे म्हणत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांच्या कार्यकर्त्यांना ओपन चॅलेज दिले आहे.

दरम्यान पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले की, आम्हाला धमक्या आम्ही सरळ युद्धात लढणारी माणसं आहोत लपून छपून नाही. त्यामुळे सुरज चव्हाण तू तर खूप चिल्लर आहेस. बारामतीमध्ये दादाला विचार ना निरावागजमध्ये पंधऱ्यामध्ये गेल्यावर काय होत. त्यामुळे तू अगोदर अजितदादांचा सल्ला घे असा टोला लक्ष्मण हाके यांनी सुरज चव्हाण यांना लगावला आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यावर जोरदार टीका करत हाके म्हणाले, अजितदादांचे लोक वादग्रस्त बोलण्याशिवाय काही करू शकत नाहीत. हे सगळे मुंबईत बसून ओबीसी, शेतकरी, कष्टकऱ्यांचे टाळूवरचे लोणी खातात. त्यांचा नेताच तसाच आहे. अजित पवार यांना कुठलाच आचार-विचार नाही. सत्ता कुठे असेल, तिकडे ते झुकतात. पहाटे पहाटे सत्तेसाठी शपथ घेतात, मग थोडी ध्यानधारणा, विपश्यना त्यांनी करायलाच हवी!"

लक्ष्मण हाके यांच्या आरोपांवर आमदार अमोल मिटकरी यांनीही तिखट भाषेत उत्तर दिलं आहे. हाके यांनी आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये मिळालेली मते पहा. २०१४ साली त्यांनी वकीलाकडून ५० हजार रुपये घेऊन निवडणूक लढवली आणि फक्त ५२७ मते मिळवली. तुझ्याकडे जी गाडी आहे, ती स्वतः घेतली की लोकांनी दिली हे सांग. तुला मिळालेली एकूण मते साडेसहा हजारही नाहीत. आणि तुला वाटतं तू अजितदादांशी तुलना करतोस?. तू मराठा-ओबीसी वाद पेटवतोस. ओबीसीसाठी काय केले, हे सांग. मी आमदार झालो, गावात माझी ग्रामपंचायत निवडून आणली. जिल्हा परिषदेत पराभूत झालो, पण सन्मानाने लढलो!


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ जून २०२५


## माझे सिंदूर आमच्याच गावात पुसले गेले - सुनिता देशमुख



**बुलढाणा :** पहलगाम हल्ल्यात देशातील भगिनींचे कुंकू पुसले गेले. या हल्ल्यात अनेक महिलांना दहशतवाद्यांनी विधवा केले. याचा बदला घेण्यासाठी भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले आणि या हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार झाल्याचा दावा करण्यात आला. देशाच्या सीमेवर अशी परिस्थिती असली तरी देशांतर्गत महिलांचेच सिंदूर सुरक्षित नसल्याचे समोर आले आहे. बुलढाणा येथील भाजपचे आमदार संजय कुटे यांचे वाहनचालक पंकज देशमुख यांचा मृत्यू झाला आहे. यानंतर त्यांच्या पत्नी सुनीता देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून भावनिक पोस्ट लिहिली आहे.

सुनीता देशमुख यांनी लिहिले की, "माझे सिंदूर आमच्याच गावात पुसले गेले. मला न्याय हवा. पहलगामचे सिंदूर दिसले आणि जे महाराष्ट्राच्या बुलढाणा जिल्ह्याच्या जळगाव जामोद गावात पुसले गेले त्याचे काय? माझे सिंदूर सिंदूर नाही का? माझ्या सिंदूरचे काही मोल नाही का? माझे मिस्टर गेली वीस वर्षापासून भाजप कार्यकर्ते आहेत. भाजप कार्यकर्त्याला न्याय मिळेल का? ३ मे २०२० रोजी माझ्या पतीचे निधन झाले. माझी मुलगी फक्त अकरा वर्षांची आहे आणि माझा मुलगा आठ वर्षांचा आहे. त्यांना न्याय मिळेल का? पहलगाम तर दूरचा विषय आहे, गावातही जनता सुरक्षित नाही".

बुलढाणा येथील जळगाव जामोदचे भाजपचे कार्यकर्ते व भाजप आमदार संजय कुटे यांचे वाहनचालक पंकज देशमुख यांचा मृतदेह ३ मे रोजी शेतात आढळून आला होता. त्यानंतर ही आत्महत्या असल्याचे बोलले गेले. परंतु ही आत्महत्या नसून ही हत्या असल्याचा दावा त्यांच्या पत्नी सुनीता देशमुख यांनी केला आहे.

आमदार संजय कुटे यांचे वाहनचालक पंकज देशमुख यांचा मृतदेह ३ मे रोजी जळगाव जामोद येथील बऱ्हाणपूर रोडवरील एका शेतात आढळून आला होता. त्यांचा मृतदेह रुमालाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला होता तसेच त्यांचे हातांवर व पायांवर जखमाही आढळल्या होत्या. यानंतर त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात नेण्यात आले. यानंतर हा मृत्यू संशयस्पद असल्याची चर्चा सुरू झाली.

पंकज देशमुख यांच्या पत्नी सुनीता देशमुख यांनी अमरावतीचे पोलिस महानिरीक्षक व बुलढाणाच्या पोलिस आधीक्षकांकडे तक्रार दाखल केली. ही आत्महत्या नसून हा घातपात असल्याची तक्रार सुनीता देशमुख यांनी केली. माझ्या पतीच्या मृत्यूची सीआयडी चौकशी करावी अशी मागणी देखील सुनीता देशमुख यांनी केली. त्यामुळे या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले.

## नव्या पिढीवर सुसंस्कार करण्यासाठी शिबिरासारखे उपक्रम राबवणे गरजेचे : पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर



**अकोट :** 'मोबाइल आणि नवमाध्यमांच्या या युगात नवी पिढी अध्ययन, जीवनमूल्ये व संस्कार यापासून दुरावता कामा नये. मुलांना ही शिकवण व संस्कार देण्यासाठी सर्वांगीण विकास शिबिरासारखे उपक्रम महत्त्वपूर्ण आहेत,' असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले.

अकोट येथील श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सर्वांगीण विकास बाल संस्कार शिबिराचा समारोप पालकमंत्री फुंडकर यांच्या उपस्थितीत झाला. श्री क्षेत्र आळंदी (देवाची) येथील वारकरी शिक्षण संस्थेच्या उपशाखेचे उद्घाटनही या वेळी झाले. आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार अमोल मिटकरी, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संदिपान शिंदे, ज्ञानपीठ संस्थाध्यक्ष वासुदेवराव महल्ले, प्रकाश जवंजाळ, उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर आदी या वेळी उपस्थित होते.

पालकमंत्री फुंडकर म्हणाले की, पाठांतर, ओव्या, अध्याय, बालमनावर सुसंस्कार करणाऱ्या पारंपरिक अध्ययन पद्धती यांची जपवणूक संस्थेतर्फे बाल संस्कार शिबिरातून होत आहे. नवमाध्यमांच्या काळात नवी पिढीला महान परंपरा व प्राचीन वारसा, मूल्ये यांची शिकवण देण्यासाठी संस्थेकडून प्रयत्न होत आहेत. संस्थेच्या कार्यासाठी व पुढील वाटचालीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य शासन स्तरावरून मिळवून देऊ, अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रारंभी पालकमंत्री फुंडकर यांनी श्री वासुदेव महाराजांच्या पादुका व प्रतिमेचे दर्शन घेतले. संस्थेच्या भोजनगृहाचे भूमिपूजन या वेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते केले. विद्यार्थ्यांनी गीतेतील श्लोकांचे सादरीकरण केले. शिबिरातील गुणवंतांना या वेळी गौरवण्यात आले.

संगीत, खेळ व कला विषयक विविध उपक्रम श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोटद्वारे 1 ते 30 मे दरम्यान श्री क्षेत्र श्रद्धा सागर, अकोट येथे बालसंस्कार व सर्वांगीण विकास शिबिराचे आयोजन केले आहे. बालसंस्कार शिबिराचे आद्यजनक संत वासुदेव महाराज यांनी बालसंस्कार शिबिराचे गावोगावी आयोजन करून संस्कार रुजवले आहेत. त्यांनी दाखवलेल्या मार्गाचे स्मरण करीत संस्था प्रतिवर्षी बाल संस्कार शिबिराचे आयोजन करते. या बालसंस्कार व सर्वांगीण विकास शिबिरात तज्ज्ञ मार्गदर्शक, शिक्षकांची नेमणूक केली होती. शिबिरात आध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक, ज्ञान- विज्ञान, संगणक प्रशिक्षण, योगासने, प्राणायाम, मनोरंजन, संगीत, खेळ व कला विषयक विविध उपक्रमांचे आयोजन केले. स्वानंद सुखनिवासी सद्गुरु श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र आळंदी देवाची यांची मान्यताप्राप्त उपशाखा श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे सुरू होत आहे. या वारकरी शिक्षण संस्थेचा शुभारंभ, 30 मे रोजी वारकरी संप्रदायातील महाराज मंडळींच्या हस्ते झाला. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी संस्थेच्या कार्यालयात नावाची नोंद करावी, असे आवाहन केले आहे.


